# ग्रामपंचायत विभाग,जिल्हा परिषद, नांदेड

जा.क्र./जिपना/ASSK/4292/2024 दिनांकः-04/11/2024

वाचाः-
१) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ दिनांक २८ एप्रिल, २०१५
२) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्र. आरटीएस-२०१५ / प्र.क्र.३२ / पंरा ५/बांधकाम भवन, मुंबई दिनांक १४ जुलै, २०१५
३) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्र. आरटीएस-२०१५/प्र.क्र.३२/पंरा-५/ बांधकाम भवन, मुंबई दिनांक ७ डिसेंबर, २०१५
४) सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन, अधिसुचना दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६
५) ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन, अधिसुचना दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९
६) महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्र. आरटीएस-२०१८ / प्र.क्र.१४५/ आस्था-५ / बांधकाम भवन, मुंबई दिनांक १३ फेब्रुवारी, २०१९
७) ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन, अधिसुचना दिनांक ७ डिसेंबर, २०२०
८) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. आरटीएस-२०२२ / प्र.क्र.१४२ / लो.दि.क दिनांक. २८ नोव्हेंबर, २०२२

## आदेश,

ज्या अर्थी राज्यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ लागू झाला आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभागाने दिनांक १० जुलै, २०१५ च्या अधिसूचनेन्वये अधिसूचित केलेल्या १३ सेवा पैकी ७ लोकसेवा महाराष्ट्र शासनाच्या आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन उपलब्ध करून दिलेल्या आहेत. तसेच दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ व दिनांक ७ डिसेंबर, २०२० च्या अधिसुचने व्दारे लोकसेवा पुरविण्यासाठीची कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपील प्राधिकारी, व्दितीय अपील प्राधिकारी अधिसूचित करण्यात आले आहेत.

त्या अर्थी ग्रामपंचायत विभागा मार्फत ग्रामपंचायतीव्दारे पात्र व्यक्तींना देण्यात यावयाच्या लोकसेवा विहीत कालमर्यादेत देण्यासाठी खालील परिशिष्ठात नमुद केल्या प्रमाणे पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपील प्राधिकारी, व्दितीय अपील प्राधिकारी यांची या आदेशाव्दारे नियुक्ती करण्यात येत आहे.

परिशिष्ठ

| अ.क्र. | लोकसेवेचे नांव | कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील प्राधिकारी | व्दितीय अपील प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन्म नोंद दाखला | ७ दिवस | संबंधीत ग्रा.पं. चे ग्रामपंचायत अधिकारी | संबंधीत पं.स. चे सहायक गट विकास अधिकारी | संबंधीत पं.स. चे गट विकास अधिकारी |
| २ | मृत्यु नोंद दाखला | ७ दिवस | संबंधीत ग्रा.पं. चे ग्रामपंचायत अधिकारी | संबंधीत पं.स. चे सहायक गट विकास अधिकारी | संबंधीत पं.स. चे गट विकास अधिकारी |
| ३ | विवाह नोंद दाखला | ७ दिवस | संबंधीत ग्रा.पं. चे ग्रामपंचायत अधिकारी | संबंधीत पं.स. चे सहायक गट विकास अधिकारी | संबंधीत पं.स. चे गट विकास अधिकारी |
| ४ | दारिद्रय रेषेखालील असल्याचा दाखला | ७ दिवस | संबंधीत ग्रा.पं. चे ग्रामपंचायत अधिकारी | संबंधीत पं.स. चे सहायक गट विकास अधिकारी | संबंधीत पं.स. चे गट विकास अधिकारी |
| ५ | ग्रा.पं. येणेबाकी नसल्याचा दाखला | ५ दिवस | संबंधीत ग्रा.पं. चे ग्रामपंचायत अधिकारी | संबंधीत पं.स. चे सहायक गट विकास अधिकारी | संबंधीत पं.स. चे गट विकास अधिकारी |
| ६ | नमुना नं. ८ उतारा | ५ दिवस | संबंधीत ग्रा.पं. चे ग्रामपंचायत अधिकारी | संबंधीत पं.स. चे सहायक गट विकास अधिकारी | संबंधीत पं.स. चे गट विकास अधिकारी |
| ७ | निराधार असल्याचा दाखला | ५ दिवस | संबंधीत ग्रा.पं. चे ग्रामपंचायत अधिकारी | संबंधीत पं.स. चे सहायक गट विकास अधिकारी | संबंधीत पं.स. चे गट विकास अधिकारी |

Scanned with OKEN Scanner

उपरोक्त नमुद पदनिर्देशीत अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी, व्दितीय अपिलीय प्राधिकारी यांनी संदर्भीय शासन अधिसुचना / शासन निर्णय / शासन परिपत्रकामध्ये नमुद सुचना नुसार तसेच शासन स्तरावरून वेळोवेळी दिलेल्या सुचना / आदेशाचे तंतोतंत पालन होईल याची दक्षता घ्यावी.

स्वाक्षरीत/-
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.)
जिल्हा परिषद, नांदेड

प्रतिलिपीः

१) मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) मा. आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, छत्रपती संभाजीनगर, यांना माहितीस्तव सविनय सादर.
३) मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.
४) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.
५) प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा परिषद, नांदेड यांना माहितीस्तव.
६) सर्व विभाग प्रमुख जिल्हा परिषद, नांदेड यांना माहितीस्तव.
७) सर्व गट विकास अधिकारी पंचायत समित्या, जिल्हा परिषद, नांदेड यांना कार्यवाहीस्तव.
८) सर्व सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समित्या, जिल्हा परिषद, नांदेड यांना कार्यवाहीस्तव.
९) सर्व विस्तार अधिकारी (पं.) पंचायत समित्या जिल्हा परिषद, नांदेड यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं.)
जिल्हा परिषद, नांदेड

Scanned with OKEN Scanner